जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ११३ दिनांक - १४/०२/२०२४

खडक पोलीस स्टेशन,पुणे शहर

### दुचाकीच्या डीकीमधुन तब्बल ११,५०,०००/- रोख रक्कम चोरी करणा-या सराईत गुन्हेगारास केले जेरबंद

फिर्यादी यांनी दि.०२/०२/२०२४ रोजी टिंबर मार्केट भवानी पेठ, पुणे येथे इमारतीचे पार्कींगमध्ये पार्क केलेले यांचे गाडीचे डिकीतील रोख ११,५०,०००/- रु त्यांचे संमती शिवाय मुद्दाम लबाडीचे इरादयाने चोरुन नेलेबाबत अज्ञात चोरटया विरोधात **खडक पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्रमांक ४३/२०२४ भा.दं.सं. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

टिंबर मार्केट सारख्या व्यापारी क्षेत्रामध्ये भर दिवसा ११,५०,०००/-रु चोरी केल्याचा प्रकार घडल्याने त्याचा तपास करुन आरोपींचा शोध घेण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, खडक पोलीस स्टेशन पुणे श्री. रविंद्र गायकवाड,पोलीस निरिक्षक(गुन्हे)श्री. संपतराव राउते, यांचे मार्गदर्शनाखाली तात्काळ तपास पथक अधिकारी सहा. पोलीस निरिक्षक राकेश जाधव व तपास पथकातील अंमलदार यांना तपासाबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तपास पथकातील अंमलदार यांची दोन पथके तयार करुन तात्काळ तपास सुरु केला तपास पथकातील एका पथकाने चोरीची घटना घडल्यानंतरचा मार्ग व एका पथकाने चोरीच्या घटनास्थळी येण्याचा मार्ग असे दोन्ही मार्गाचे सी.सी.टि.व्ही.फुटेज पाहण्यास सुरुवात केली.फुटेज तपासल्यानंतर फुटेजचे आधारे पाहीजे आरोपीचा माग घेत असताना सदर पाहीजे आरोपी हा बोपखेल फाटा येथे थांबला असल्याबाबत खात्रीशीर माहीती मिळाली. त्याअनुषंगाने बोपखेल फाटा याठिकाणी वरील वर्णनाचा इसम तेथे संशयित रित्या वावरताना मिळुन आला त्यास ताब्यात घेतले व त्याचे नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव **रामकेवल राजकुमार सरोज,वय-४६ वर्षे,सध्या रा- ज्ञानदा सोसायटी शिक्रापुर रोड चाकण पुणे,मुळ रा.१७२ पौथीपुर, कधईपुर, सुलतानपुर, लंभुआ, राज्य- उत्तरप्रदेश** असे सांगितले. त्याचेकडे गुन्हयाबाबत अधिक विचारणा केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यास ताब्यात घेवुन दाखल गुन्हयात दिनांक १०/०२/२०२४ रोजी अटक करण्यात आले आहे.

अटक आरोपीकडे गुन्हयात चोरी केलेल्या ११,५०,०००/- रु रोख रकमेबाबत चौकशी केली त्याने रोख रक्कम बँकेत पत्नीचे खात्यावर जमा केल्याबाबत सांगितले.संबंधित बँकांना पत्रव्यवहार करुन वरील नमुद बँकेची खाती गोठविण्यात आली आहेत.

तसेच अटक आरोपीने चोरी करताना वापरलेल्या वाहनाबाबत तपास केला असता चोरी करताना वापरलेले होंडा शाइन ही मोटारसायकल राजगड पोलीस स्टेशन गु.र.नं.२६/२०२४ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे मधील चोरीस गेलेले वाहन असल्याचे तपासात निपन्न झालेले असुन सदरची मोटारसायकल ताब्यात घेतली आहे.

सदर गुन्हाचे तपासाकरीता नेमलेल्या पथकातील पोलीस अंमलदार यांनी जवळजवळ ५०० पेक्षा अधिक सी.सी.टि.व्ही. चिकाटीने तपासुन चोरटयाचा माग काढुन आरोपीला ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणला आहे. त्याचेवर पुणे शहर, पिंपरी चिंचवड, मुंबई आयुक्तालयात असे एकुण चोरीचे ३० गुन्हे दाखल असुन तो सराईत गुन्हेगार आहे. गुन्ह्याचा पुढील तपास राकेश जाधव सहा. पोलीस निरिक्षक,हे करीत आहेत

सदरील कारवाई ही, मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे श्री. प्रविण पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ श्री. संदिपसिंह गिल, व मा.सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग श्रीमती रक्मीणी गलांडे, यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.रविंद्र गायकवाड,पोलीस निरीक्षक(गुन्हे),श्री.संपतराव राउते, तपास पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक राकेश जाधव पोलीस अंमलदार संदिप तळेकर, किरण ठवरे, हर्षल दुडम, प्रमोद भोसले, अक्षयकुमार वाबळे, सागर कुडले, लखन ढावरे, प्रशांत बडदे, रफिक नदाफ, आशिष चव्हाण यांचे पथकाने केली आहे.